33 CR200020413 (२३३)

क्रमांक/क्रांस्प/स-१/२०००.
पुणे, दिनांक :-४/२/२०००.

विषय:- संगणकीकृत मिळकत पत्रिकेवरील नोंदी अद्यावत आणणेबाबत.

परिपत्रक

नगर भूमापन अधिकारी, क्र.१ पुणे यांचे कार्यालयांस दि.२/२/२००० रोजी भेट देऊन मिळकत पत्रिकेच्या संगणकीकरणाचे कामाची पहाणी केली असता माझे असे निदर्शनास आढळून आले की, मिळकत पत्रिकेचें संगणकीकरणाचे काम पूर्ण झालेनंतर संगणकीकृत मिळकत पत्रिकेवर बदलाच्या नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत, व नोंदी अद्यावत न आणताच संगणकीकृत मिळकत पत्रिकेच्या नकला दिल्या जातात. त्यामुळे जनतेला त्यांच्या मिळकतीवरील अद्यावत नोंदीबाबत माहिती मिळण्याचा हेतू साध्य होत नाही.

सबब, संगणकीकृत मिळकत पत्रिकेवरील नोंदी अद्यावत आणणेबाबत खालीलप्रमाणे सूचना देण्यांत येत आहेत.

१. नगर भूमापन अधिकारी यांचेकडून ज्या दिवशी कोणत्याही बदलाबाबत नोंदी मंजूर केल्या जातात त्याच दिवशी नोंदी प्रमाणीत करणाऱ्या अधिकाऱ्यांनी त्याबाबतची संपूर्ण माहिती नगर भूमापन क्रमांकासह संगणकीकरण शाखेस द्यावी.

२. नगर भूमापन अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झालेनंतर संगणकीकरण शाखेकडून संबंधीत संगणकीकृत मिळकत पत्रिकेवर योग्य त्या दुरुस्त्या करण्यांत याव्यात.

३. वरीलप्रमाणे संगणकीकृत केलेल्या मिळकतीवरील नोंदी अद्यावत करणेचे काम तात्काळ सुरु करणेत यावे. सदरचे काम दैनंदिन कार्यालयीन काम सांभाळून पूर्ण करणेचे आहे.

४. मिळकत पत्रिकेचे संगणकीकरण सुरु केलेपासून आतापर्यंत नगर भूमापन कार्यालयाकडून मिळकत पत्रिकेवर करण्यांत आलेल्या दुरुस्ती कागदः

आढावा घेऊन ज्या संगणकीकृत मिळकत पत्रिकेवरील नोंदी अद्यावत करावयाच्या आहेत त्या अद्यावत आणण्याची कार्यवाही कोणत्याही परिस्थितीत ३१ मार्च २००० पूर्वी पूर्ण करण्यांत यावी.

५ अद्यावत करण्यांत आलेल्या संगणकीकृत मिळकत पत्रिकेवर नोंदी अद्यावत केल्याबाबत "U" हा कोड नंबर नमूद करणेत यावा. हा कोडनंबर नोंदी अद्यावत केलेल्या सर्व मिळकत पत्रिकेसाठी एकच ठेवणेत यावा.

वरील सूचनांची अंमलबजावणी तात्काळ करणेची आहे.

(मोहन पडवतर)
जमाबंदी आयुक्त आणि संचालक
भूमि अभिलेख (महाराष्ट्र राज्य)

प्रत- जमाबंदी उप आयुक्त (सर्वसाधारण/भूमापन/नागरी भूमापन/एकत्रीकरण)
प्रत- उपसंचालक भूमि अभिलेख सर्व
प्रत- अधिक्षक भूमि अभिलेख, पुणे/ठाणे/मुंबई/नागपूर यांना माहिती व कार्यवाहीसाठी
प्रत- नगरभूमापन अधिकारी क्र. १ पुणे / ठाणे / कोल्हापूर १,२,३ यांना माहिती व सत्वर कार्यवाहीसाठी